सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ६०१ /वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- ११/११/२०२१

# —: प्रेस नोट :—

## —: निर्भया पथक कामगिरी :—

टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ११/११/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास टिळकनगर मोबाईल ०५ मधून निर्भया पथकातील अधिकारी परि.पो.उप.नी. श्रद्धा पारसे, पो.शि.क्र. ०९२९३१/ सांगळे व म.पो.शि. क्र. १४०८५१ /मोटे व म. पो. ह. क्र. ९७०३२४/ अहिरे हे टिळक नगर पोलिस ठाणे हद्दीतील परिसरात गस्त करत असताना साधारण सकाळी ७.३५ वा. च्या सुमारास मुख्य नियंत्रण कक्ष यांचेकडून संदेश प्राप्त झाला की, एक मुलगी एकटीच बसलेली असून तिला पोलीस मदत हवी आहे. सदर संदेश प्राप्त होताच निर्भया पथकातील अधिकारी परि. पो. उप.नि. श्रद्धा पारसे व पथक सदर ठिकाणी रवाना झाले. लोकमान्य टिळक टर्मिनस येथे कर्तव्यावर असलेले स. फौ. साळुंखे व पो. ना. बांगर यांना सदर मुलगी मिळुन आल्याने त्यांच्याकडून सदर मुलीस ताब्यात घेतले. सदर मिळालेली मुलगी काहीच बोलत नसल्याने व ती रडत असुन घाबरलेली असल्याचे दिसून आले. सदर मुलीला विश्वासात घेवून पुढील चौकशीकामी टिळकनगर पोलीस ठाण्यात आणले असता रात्रपाळी ठाणे अंमलदार स.पो.नि. अंकोलीकर व परि. पो. उप.निरिक्षक पारसे व निर्भया पथक यांनी तिला विश्वासात घेवून चौकशी केली. सदर वेळी अल्पवयीन मुलगी मध्यप्रदेश येथील असल्याचे तिने सांगितले व तिच्या घरात आई, वडिल भाऊ व बहिण रहावयास आहेत. ती येथे कशासाठी आली याबाबत तिच्याकडे अधिक विचारपुस केली असता तिला सिंगर बनायचे होते. परंतु तिच्या घरातून नकार असल्याने ती तिच्या घरच्यांना न सांगता दि.१०/११/२०२१ रोजी भोपाळ, राज्य मध्य प्रदेश येथून सायं १६.५० वा. पंजाब मेल क्र. २३२-९९३६०४२ मेल ने दि.११/११/२०२१ रोजी सकाळी ७.३० वा. लोकमान्य टिळक टर्मिनस येथे आल्याबाबत सांगितले.

सदर मुलीस म.पो.नि. चव्हाण यांचे समक्ष तिच्या पालकांचा फोन नंबर घेउन व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क केला असता त्यांनी सदर अल्पवयीन मुलीस ओळखले व त्यांचीच मुलगी असल्याचे सांगितले. तिच्या पालकांनी मध्य प्रदेशामधील स्थानिक पो. ठाणेस त्यांची मुलगी हरवलेली असल्याचे तक्रार दिली असल्याबाबत सांगीतले. सदर पोलीस ठाणेस संपर्क करुन सदर अल्पवयीन मुलगी टिळकनगर पो. ठाणेच्या ताब्यात असल्याचे सांगितले.

तरी दि.११/११/२०२१ रोजी रात्री ८ वाजता सदर मुलीचे वडिल व काका व मध्य प्रदेश पोलीस रायसन पुलिस स्टेशनचे सब इन्स्पेक्टर सुरेश कन्जुर व म.पो.ह.क्र. ३०४ /खरे सदर मुलीस घेउन जाण्याकरिता आले असता, सदर मुलीकडे सापडलेला मुद्देमाल रक्कम व इतर साहित्या सह सदर अल्पवयीन मुलगी हिस रात्रपाळी पर्यवेक्षक पो नि चव्हाण मैडम यांनी तिच्या वडीलांच्या ताब्यात सुखरुप दिले. व मध्य प्रदेश पोलिसांनी त्याच्या गु.र.क्र. ४६३/२०२१ मधे मुंबई पोलिस व निर्भया पथकाने मदत केल्याबाबत आभार व्यक्त केले. सदर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी प्रशंसनीय कामगिरी केली व जनमाणसातील मुंबई पोलीसांची प्रतिमा उचविण्याचे सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे.

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner